कला अकादमी गोवा
पणजी – गोवा
कअ/कविवि/शानृमो/२०२५-२६/२२६४
दि. २४/०३/२०२६

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोवा व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देशातील प्रतिष्ठेच्या नृत्यमहोत्सवात गणला जाणारा 'नुपुर' हा शास्त्रीय नृत्य महोत्सव यंदा दि. २७, २८ व २९ मार्च २०२६ या कालावधीत म्हार्दोळ येथील श्रीमहालसा संस्थानच्या सौजन्याने श्री महालसा देवस्थानच्या प्रांगणात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त तसेच गोमंतकीय नृत्यकलाकारांच्या सहभागाने संपन्न होणार आहे. यंदाचा हा २९ वा महोत्सव असून या वर्षी कुचिपुडी, भरतनाट्यम, कथ्थक, मोहिनीअट्टम या विविध शास्त्रीय नृत्यप्रकारातील ख्यातनाम कलाकारांची अदाकारी पाहण्याची संधी गोमंतकीय नृत्यरसिकांना लाभणार आहे.

'नुपुर' महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ रोजी रात्री. ८.१५ वा. कला अकादमीचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत कवळेकर यांच्याहस्ते व पद्मश्री श्री. विनायक खेडेकर, आमदार, श्री. गोविंद गावडे, कला व संस्कृती संचालनालयाचे संचालक, श्री. विवेक नाईक व श्रीमहालसा संस्थान समितीचे, अध्यक्ष, श्री. प्रेमानंद कामत यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

उद्घाटन समारंभाला जोडून दि. २७ मार्च रोजी रात्री. ८.३० वा. बेंगळुरु स्थित डॉ. वसंत किरण व श्रीमती वैष्णवी मुकुंदन हे कुचिपुडी युगल नृत्य सादर करणार आहेत. पहिल्या दिवशीचा समारोप कला अकादमीच्या संगीत नृत्य विभागातील विद्यार्थ्यांच्या भरतनाटयम नृत्य सादरीकरणाने होणार आहे.

शनिवार दि. २८ मार्च रोजी सायं. ७.०० वा. कला अकादमीचे भारतीय संगीत व नृत्य विभागातील विद्यार्थी कथक नृत्य प्रस्तुत करणार आहेत. त्यानंतर मुंबई येथील ख्यातनाम नृत्यांगना श्रीमती दिव्या वोरियर यांच्या मोहिनीअट्टम नृत्याने २८ मार्च रोजीच्या कार्यक्रमाचा समारोप होईल.

रविवार दि. २९ मार्च २०२६ रोजी रात्री. ८.३० वा. गोमंतकीय प्रज्ञावंत नृत्यांगना श्रीमती प्रार्थना कौशिक "कला निलयम स्कूल ऑफ आर्ट" या कलाकारांची (ग्रुप कोरीयोग्राफी) सादर होणार आहेत. त्यानंतर कोलकाता येथील ख्यातनाम नृत्यांगना श्रीमती दुर्गा आर्या यांच्या कथ्थक नृत्याने नृत्य महोत्सवाची सांगता होणार आहे.

महोत्सवातील सर्व कार्यक्रम रसिकांसाठी खुले असून नृत्यप्रेमी रसिकांनी तिन्ही दिवसांच्या नृत्यप्रस्तुतीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सव यसस्वी करावा असे आयोजकांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

(श्री. शंकर ब. गांवकर)
सदस्य सचिव
कला अकादमी गोवा

सोबतः प्रसिध्दीसाठी कलाकारांची छायाचित्रे

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)